# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

# Date – 04 January 2025

# Time 7.10 AM to 7.20 AM

# Language Marathi

## **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

## **प्रादेशिक बातम्या**

## **दिनांक ०४ जानेवारी २०२५ सकाळी ७.१० मि.**

********

- भविष्यातल्या आव्हानांसाठी नवी पिढी घडवण्यावर नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात भर दिल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
- क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सर्वत्र अभिवादन–नायगाव इथलं नियोजित स्मारक पाच वर्षांत पूर्ण करण्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही
- शेतीच्या नुकसानाचं आता उपग्रहाव्दारे सर्वेक्षण–केंद्रीय कृषीमंत्र्यांची माहिती
- कामाच्या ठिकाणी महिलांसाठी सुरक्षित वातावरणाची आवश्यकता राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांच्याकडून व्यक्त

आणि

- जालना इथं ३० लाख रुपये लाच मागणाऱ्या सहायक निबंधकासह दोघांना अटक

********

भविष्यातल्या आव्हानांसाठी नवी पिढी घडवण्यावर नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात अधिक भर दिल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. काल दिल्लीत विविध विकास कामांचं लोकार्पण केल्यानंतर नागरिकांशी बोलतांना पंतप्रधान म्हणाले..

> ***“हमे सिर्फ बच्चों को सिर्फ पढाना ही नही है, बल्की वर्तमान और भविष्य की जरूरतों के लिए नई पिढी को तयार करना है। नई नॅशनल एज्युकेशन पॉलिसी मे इसी बात का ध्यान रखा गया है। नई राष्ट्रीय शिक्षा निती गरीब परिवार का बच्चा हो, मध्यम परिवार की संतान हो अब वो अपनी***

***मातृभाषा मे पढकर के डॉक्टर भी बन सकता है। इंजिनियर भी बन सकता है। और बडी से बडी अदालत में मुकदमा भी लड सकता है।''***

दरम्यान, आज नवी दिल्लीत ग्रामीण भारत महोत्सव २०२५ चं पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. `२०४७ पर्यंत विकसित भारत` ही या महोत्सवाची संकल्पना आहे.

स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९४व्या जयंतीनिमित्त पंतप्रधानांनी काल त्यांना अभिवादन केलं. महिला सक्षमीकरणाच्या जननी आणि शैक्षणिक तसंच सामाजिक सुधारणा क्षेत्रातल्या अग्रणी असलेल्या सावित्रीबाईंचं कार्य सतत प्रेरणा देत असल्याचं, पंतप्रधानांनी सामाजिक माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतींना काल सर्वत्र अभिवादन करण्यात आलं. सावित्रीबाईंच्या जन्मगावी, सातारा जिल्ह्यातल्या नायगाव इथं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सावित्रीबाई आणि ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहिली. माजी मंत्री छगन भुजबळ, इतर मागास आणि बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, पर्यावरण आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, महिला आणि बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. गेल्या कार्यकाळात तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नायगाव इथं घोषणा केलेलं सावित्रीबाईंचं स्मारक त्यांच्या द्वी शताब्दी जयंतीपूर्वी तयार करण्याचं आश्वासन मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिलं. या स्मारकासाठी आवश्यक भूसंपादन प्रक्रिया तत्काळ सुरू करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी साताऱ्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिले...

***''स्मारक हे केवळ पुतळ्यापुरतं मर्यादित नाहीये. स्मारक पुतळ्यांसोबत विचारांचंदेखील झालं पाहिजे, आणि मी आपल्याला यानिमित्ताने शब्द देतो, की निश्चितपणे अशा प्रकारचं जे स्मारक आहे, ते याठिकाणी आम्ही पूर्ण करून दाखवू. बरोबर पाच वर्षांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंची द्विशताब्दी सुरू होणार आहे. त्या द्विशताब्दीपूर्वी हे स्मारक तयार ठेवलं पाहिजे. जिल्हाधिकारी तुम्हाला मी जबाबदारी देतो यातलं पहिलं काम दहा एकर जमीन अधिगृहीत करण्याकरता तात्काळ कारवाई सुरू करा.''***

**

सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी मुंबईत मंत्रालयात तर विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी छत्रपती संभाजीनगर इथं सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केलं.

छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, हिंगोली, लातूर, नांदेड आणि धाराशिव इथं विविध शासकीय कार्यालयं, लोकप्रतिनिधी तसंच पक्ष संघटनांकडून सावित्रीबाई फुले यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं.

हिंगोली जिल्हा महिला आर्थिक विकास महामंडळाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समिती सभागृहात सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त महिला मेळावा घेण्यात आला. जास्त कर्ज मिळालेल्या गटांचा तसंच ग्रामीण भागात उत्कृष्ट काम करणारे सीआरपी अर्थात समुदाय संसाधन प्रतिनिधींचा यावेळी सत्कार करण्यात आला.

****

मराठवाड्याच्या हक्काच्या कृष्णा खोऱ्यातील पाण्याबाबत पुढच्या आठवड्यात बैठक घेऊन सर्व आढावा घेणार असल्याचं जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी म्हटलं आहे. ते काल तुळजापूर इथं पत्रकारांशी बोलत होते. 'दुष्काळ तिथे पाणी' यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात नदी जोड प्रकल्प हाती घेतला असून यामुळे कुठेच दुष्काळ भासणार नाही, असं सांगत लवकरच धाराशिव जिल्ह्यात पाणी येईल अशी ग्वाही पाटील यांनी दिली.

****

दरम्यान, जायकवाडी धरणात पाणी सोडण्यासंदर्भात मेंढगिरी समितीच्या शिफारसींचं मूल्यांकन करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाने एक समिती गठीत करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. पूर्वीच्या अहवालानुसार जायकवाडीत ६५ टक्के पाणी शिल्लक असेल तरीही नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील धरणांमधून पाणी सोडण्याची शिफारस होती, मात्र नव्या शिफारसीनुसार जायकवाडीत ५८ टक्के पाणी साठा असेल तरीही, वरच्या धरणातून पाणी सोडण्याची आवश्यकता नाही. या नव्या अहवालावर हरकती आणि सूचना मागवण्यात येणार असून, यासंदर्भात नाशिक इथं पाणी परिषद घेणार असल्याचं, आमदार देवयानी फरांदे यांनी सांगितलं आहे. त्या काल नाशिक इथं पत्रकार परिषदेत बोलत होत्या.

****

शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या नुकसानाचं, आता उपग्रहाव्दारे सर्वेक्षण केलं जाणार असल्याचं केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी सांगितलं. ते काल नाशिक इथं यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील कृषी विकास केंद्रात किसान संवाद मेळाव्यात बोलत होते. उपग्रहाद्वारे सर्वेक्षणामुळे नुकसानाचं अचूक मोजमाप होऊन शेतकऱ्यांना अपेक्षित भरपाई मिळू शकेल असा विश्वास चौहान यांनी व्यक्त केला. ते म्हणाले...

> ***''फसल खराब हुई तो सॅटेलाईट के आधार पर रिमोट सेन्सिंग से इमेज लेंगे। फसल के नुकसान का आकलन करेंगे। और वो आकलन परफेक्ट होगा और जितना नुकसान होगा फसल का, फसल का उत्पादन कम होगा, उसका आकडा होगा सीधा किसान के अकाऊंट मे डीबीटी के माध्यम से डाल दिया जायेगा।''***

****

कामाच्या ठिकाणी महिलांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण होणं आवश्यक असल्याचं, राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी म्हटलं आहे. त्या काल लातूर इथं जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत बोलत होत्या. या संदर्भात कार्यालयातल्या प्रत्येक सहकाऱ्याची जबाबदारी महत्त्वाची असल्याचं त्यांनी नमूद केलं. दरम्यान, महाराष्ट्र पोलिस स्थापना दिनानिमित्त लातूर इथं दोन दिवसीय पोलीस प्रदर्शनाचं रहाटकर यांच्या हस्ते काल उद्घाटन झालं. या प्रदर्शनात पोलिस दलातल्या विविध विभागांची माहिती आणि शस्त्र पाहता येणार आहेत.

****

जालना इथल्या ३० लाख रुपये लाच मागणाऱ्या सहायक निबंधकासह आणखी एकास अटक करण्यात आली आहे. संजय अर्जुनराव राख आणि सहकार अधिकारी शेख रईस शेख जाफर अशी त्यांची नावं असून, मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थेविरुध्द दाखल तक्रार अर्ज निकाली काढण्यासाठी या दोघांनी लाच मागितली होती. या दोघांविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

****

क्रिकेट

सिडनी इथं सुरु असलेल्या बॉर्डर गावस्कर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पाचव्या आणि अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियानं कालच्या एक बाद नऊ या धावसंख्येवरून

पुढे खेळण्यास प्रारंभ केला. अखेरचं वृत्त हाती आलं तेव्हा, ऑस्ट्रेलियाच्या पाच बाद १०१ धावा झाल्या होत्या.
दरम्यान, या कसोटीत काल भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला, भारताचा पहिला डाव अवघ्या १८५ धावांवर संपुष्टात आला.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या गरवारे क्रीडा संकुलावर आजपासून भारतीय क्रिकेट नियामक मंडळ–बीसीसीआयकडून १९ वर्षांखालील महिलांची क्रिकेट स्पर्धा सुरू होत आहे. या मैदानावर फ्लड लाईट्स आणि खेळपट्टीचं काम पूर्ण झाल्यावर प्रथमच आंतरराष्ट्रीय दर्जाची स्पर्धा होणार आहे.

****

लातूर इथं सुरू असलेल्या अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या एकोणसाठाव्या प्रदेश अधिवेशनात काल भव्य शोभा यात्रा काढण्यात आली. या यात्रेचा समारोप जाहीर सभेत करण्यात आला. परिषदेच्या राष्ट्रीय मंत्री शालिनी वर्मा यांनी यावेळी मार्गदर्शन केलं.

****

पारंपारिक लोककलांचे संवर्धन आणि कलाकरांना प्रोत्साहन हे आपलं ध्येय असून, कलाकारांना शासकीय अनुदान मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचं, आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी म्हटलं आहे. ते काल नांदेड इथं माळेगाव यात्रेत लोककला महोत्सवाचं उद्घाटन केल्यानंतर बोलत होते. विविध कलावंतांचा यावेळी चिखलीकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

****

छत्रपती संभाजीनगरचे माजी महापौर नंदकुमार घोडेले आणि अनिता घोडेले या दाम्पत्याने काल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातून शिवसेनेत प्रवेश केला. शिवसेनेचे मुख्य नेते तथा उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत हा पक्ष प्रवेशसोहळा पार पडला.

****

आमदार ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू यांनी दिव्यांग कल्याण मंत्रालय अभियानाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्याचं वृत्त आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे त्यांनी हा राजीनामा पाठवला असून आपल्याला देण्यात आलेली सुरक्षा काढून

टाकावी अशी विनंतीही त्यांनी मुख्यमंत्र्यांना केल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****